# अध्यक्षांचे मनोगत



सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

आपणा सर्वांचे आराध्यदैवत व आपल्या **दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेचे** संस्थापक, **ह.भ.प. वै. दत्तात्रय महाराज कळंबे**, बँकेचे सातत्यपुर्ण मार्गदर्शक राहिलेले सातारा जिल्ह्याचे जेष्ठ नेते, थोर स्वातंत्र्य सेनानी **स्व. भिलारे गुरुजी (दादा)**, महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार **स्व. यशवंतराव चव्हाण**, माथाडी कामगारांचे दैवत **स्व. अण्णासाहेब पाटील**, यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करुन बँकेच्या ५३ व्या वार्षिक सर्वसधारण सभेस उपस्थितीत असलेल्या सर्व सभासद बंधु भगिनींचे बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वप्रथम हार्दिक स्वागत करतो.

आपल्या बँकेच्या सर्वांगीन विकासाकरीता सातत्यपुर्ण मार्गदर्शन लाभत असलेले **मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब** - माजी केंद्रिय कृषी आणि अन्न प्रक्रिया मंत्री, **मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस** - मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. ना. एकनाथजी शिंदे** - उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. ना. श्रीमती सुनेत्राताई अजित पवार** - उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. ना. श्रीमंत छ. शिवेंद्रराजे भोसले** - आमदार - जावली - सातारा, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) कॅबिनेट मंत्री, **मा. ना. श्री. मकरंद पाटील (आबा)** - आमदार - वाई - महाबळेश्वर - खंडाळा, मदत व पुनर्वसन कॅबिनेट मंत्री, **मा. खा. श्री. आनंदरावजी अडसुळ** - माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री, अध्यक्ष व को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन, अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य अनुसुचीत जाती जमाती आयोग, **मा. श्रीमंत छ. उदयनराजे भोसले** - खासदार - सातारा, संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे** - खासदार - कल्याण, **मा. श्री. नितीन लक्ष्मणराव पाटील** - खासदार - राज्यसभा, अध्यक्ष - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **मा. श्री. शशिकांतजी शिंदे** - प्रदेशाअध्यक्ष - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शप), माजी जलसंपदा मंत्री तसेच मा. आमदार विधान परिषद, **मा. श्री. नरेंद्र पाटील** - मा. आमदार - विधान परिषद, सरचिटणीस - माथाडी कामगार युनियन, अध्यक्ष - आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, **मा. श्री. सदाशिवभाऊ सपकाळ** - माजी आमदार - जावली, **मा. श्री. दगडु (दादा) सपकाळ** - मा. आमदार, परळ, मुंबई, **मा. श्री. वसंतराव मानकुमरे (भाऊ)** - माजी उपाध्यक्ष व विद्यमान सदस्य - सातारा जिल्हा परिषद, माजी संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **मा. श्री. राजेंद्रशेट राजपुरे** - मा. उपाध्यक्ष - संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **मा. श्री. सौरभ (बाबा) शिंदे** - सभापती - जावली पंचायत समिती, अध्यक्ष - प्रतापगड सहकारी साखर कारखाना, **मा. श्री. ज्ञानदेव रांजणे** - संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., **मा. श्री. अमितदादा कदम** - माजी सभापती - अर्थ व शिक्षण समिती, सातारा जिल्हा परिषद, **मा. श्री. एकनाथजी ओंबळे** - सातारा जिल्हा सह-संपर्क प्रमुख, शिवसेना (शिंदेगट), त्याचप्रमाणे को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष, सरचिटणीस, केंद्रिय तसेच स्थानिक कार्यकारीणी, सहकार क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या विविध आर्थिक संस्था व त्यांचे सर्व पदाधिकारी, क्रिडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था, बँकेबद्दल आत्मीयता असलेले बँकेचे असंख्य खातेदार, ठेवीदार, कर्जदार, सभासद, हितचिंतक व मान्यवरांनी अहवाल वर्षामध्ये बँकेप्रती दाखविलेला अभुतपुर्व विश्वास, प्रदान केलेले योगदान आणि अमुल्य मार्गदर्शन यामुळे **रु. १०६९ कोटी इतका ठेवींचा टप्पा** पार पाडता आलेला असल्याने आणि आपली बँक भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशनांना अधिन राहुन **TIER-3 बँक श्रेणीत वर्गीकृत** झालेली असल्याचा मला अवर्जून उल्लेख करावा लागेल. सहकारी बँकिंग व्यवसायामध्ये आपली बँक सर्वोच्च स्थानावर विराजमान होण्यासाठी बँकेचे सर्व घटक बँक व्यवस्थापनाला सर्वतोपरी सहकार्य करीत असल्याने या सभेला संबोधीत करतांना मला विशेष आनंद होत आहे.

## आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्था :

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ दरम्यान जागतिक अर्थव्यवस्थेवर महागाई, व्याजदरातील वाढ, भू-राजकित (geo-political) तणाव आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनिश्चिततेचा प्रभाव कायम राहिला. विकसित देशांमध्ये आर्थिक वाढ मर्यादित राहिली असली तरी आपल्या देशासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांनी तुलनेने आपले आर्थिक स्थैर्य कायम राखण्यात यश प्राप्त केले. केंद्र शासनाच्या भांडवली खर्चाला प्राधान्य देणाऱ्या धोरणांमुळे गुंतवणूक वातावरणास चालना मिळाली असून आर्थिक विकासाला बळकटी

प्राप्त झाली आहे. उपलब्ध अधिकृत आकडेवाडीनुसार भारताचा **सकल देशांतर्गत उत्पन्न वाढीचा दर (GDP)** ७.७०% इतका राहिला. जागतिक स्थरावर मध्यवर्ती बँकांनी महागाई नियंत्रणासाठी कठोर चलनविषयक धोरणे अवलंबल्याने वित्तीय बाजारपेठांमध्ये अस्थिरता दिसुन आली. भारतीय अर्थव्यवस्थेने मात्र मजबुत अंतर्गत मागणी, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, सेवा क्षेत्रांतील वाढ आणि स्थिर बँकिंग प्रणालीच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी कायम ठेवली. अहवाल वर्षात उत्पादन, सेवा, डिजीटल व्यवहार, जी एस टी संकलन आणि भांडवली गुंतवणूक यांमध्ये सकारात्मक वाढ नोंदविण्यात आलेली आहे. भारतीय रिजर्व्ह बँकेने महागाई नियंत्रण, वित्तीय स्थैर्य आणि बँकिंग क्षेत्रातील तरलता व्यवस्थापन यांमध्ये संतुलित धोरण अवलंबलेले आहे.

आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर ६.३% ते ६.६% दरम्यान राहण्याचा अंदाज विविध संस्थांनी व्यक्त केलेला आहे. तथापि, पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या किंमतीतील चढ-उतार, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनिश्चितता यांचा आर्थिक वाढीवर परिणाम होऊ शकतो. भारतीय रुपयावर काही प्रमाणात दबाव राहण्याची शक्यता असली तरी देशाचा मजबूत परकीय चलन साठा, नियंत्रीत वित्तीय तूट, वाढती निर्यात क्षमता आणि स्थिर बँकिंग व्यवस्था यांमुळे व्यापक आर्थिक स्थैर्य कायम राहण्याची अपेक्षा आहे. महागाई रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षित मर्यादित राहिल असा अंदाज असून चलनविषयक धोरणात संतुलित भूमिका कायम राहण्याची शक्यता आहे.

## बँकिंग सेवा-सुविधांकरीता निर्माण केलेली व्यवस्था :

सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी नियामक अनुपालन, डिजीटलायजेशन, जोखीम व्यवस्थापन आणि भांडवली सक्षमता यांवर अधिक भर देण्यात आला. या पार्श्वभूमीवर अहवाल वर्षामध्ये आपल्या बँकेने सावध वित्तीय धोरण, मजबूत जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहक केंद्रीत सेवा यांच्या माध्यमातून नेत्रदिपक अशी प्रगती साधलेली आहे. आपल्या बँकेने अहवाल वर्षात बँकिंग व्यवसायातील वाढती स्पर्धा, दिवसेंदिवस विकसीत होत असलेले आधुनिक तंत्रज्ञान, डिजीटल बँकिंगकडे वाढत असलेला कल आणि बँकिंग सेवांविषयीच्या ग्राहकांच्या वाढत असलेल्या अपेक्षा आदी बाबींचा साकल्याने विचार करुन बँकेची कार्यप्रणाली अधिकाधिक सक्षम करण्यावर तसेच गुणात्मक मनुष्य बळ विकसीत करण्यावर भर दिलेला आहे. बँकेच्या सुधारित कार्यप्रणालीद्वारे बँकिंग सेवा-सुविधा अधिक गतीमान झालेल्या आहेत. आपल्या बँकेच्या मुख्यालयातील विविध विभाग आणि २७ शाखांचे माध्यमातुन भारतीय रिझर्व्ह बँक आणि सहकार खाते यांचे सर्व निर्देशांची समाधानकारकपणे अंमलबजावणी करुन बँकिंग व्यवसायातील आपले दायीत्व अधोरेखीत केलेले आहे.

अहवाल वर्षामध्ये बँकेद्वारे बँकेच्या **चेंबूर** शाखेचे नवीन जागेत स्थानांतर करण्यात आलेले असुन आपल्या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी अहवाल वर्षामध्ये बँकेद्वारे नवी मुंबईत **तुर्भे**, **उलवे-बामनडोंगरी**, **तळोजा-पेंधर** या तीन नवीन शाखां कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. आपल्या बँकेच्या विविध शाखांमध्ये ऑनसाईट ए टी एम सुविधा कार्यान्वित करण्यात आलेल्या असुन सदर ए टी एम द्वारे बँकेच्या समस्त खातेदारांना Rupay Debit Cards च्या माध्यमातुन ए टी एम सेवा, RTGS/NEFT, IMPS, Mobile Banking सारख्या सुविधा प्रदान करण्यात येत असतात. आपल्या बँकेद्वारे पॅराबँकिंग व्यवसायाअंतर्गत खातेदार-सभासदांना जीवन-विमा, जनरल-विमा, प्रधानमंत्री जीवनज्योत बिमा योजना त्याचप्रमाणे PAN Card प्रदान करण्याबाबतच्या सुविधा समाधानकारकपणे प्रदान करण्यात येत असतात. बँकेने आपल्या ग्राहकांचे तात्काळ व्यवहारांकरीता क्यु-आर कोड प्रदान करण्याची सुविधा प्रदान केलेली असुन सदर सेवेचा फायदा असंख्य बँक ग्राहकांना होत असल्याबाबत नमुद करतांना मला विशेष आनंद होत आहे. वरील प्रकारच्या डिजीटल व्यवहारांद्वारे ग्राहक वर्गाला अधिक तत्पर स्वरुपात बँकिंग सेवा-सुविधा प्राप्त होत असतात.

## आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील बँकेची आर्थिक स्थिती :

वार्षिक अहवालाचे माध्यमातुन वर्ष २०२५-२६ च्या बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत आपणा सर्वांशी संवाद साधतांना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो की, **ह.भ.प. वैकुंठवासी दत्तात्रय महाराज कळंबे** यांनी १९७३ च्या सुमारास आध्यात्मिक विचारधारा

जोपासत कष्टकरी कामगार वर्गाचे आर्थिक उन्नती करीता स्थापन केलेल्या, सर्वसामान्यांच्या विकासाची अर्थवाहिनी असलेल्या आणि सहकारी बँकिंग व्यवसायामध्ये एक वेगळे स्थान निर्माण केलेल्या आपल्या बँकेद्वारे सन २०२५-२६ या आपल्या ५३ व्या वर्षामध्ये आर्थिक प्रगतीचे विविध निकष पुर्ण करीत नेत्रदिपक अशी प्रगती साधलेली आहे. बँकेने अहवाल वर्ष २०२५-२६ मध्ये समस्त संचालक मंडळ सदस्य, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, सर्व श्रेणीचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे समर्पित सहभागाद्वारे कर्ज मंजुरी, अनुत्पादित कर्जांची वसुली, ठेवीतील वाढ यांचा नियोजनबध्द कार्यक्रम राबवुन बँकेचा व्यवसाय आणि उत्पादन क्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करुन त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या भांडवली व महसुली खर्चामध्ये कपात करुन नफा क्षमता वाढविण्यात यश संपादन केलेले आहे.

दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या अहवाल वर्षात बँकेचे संचालक मंडळ आणि सेवक वर्गाची सकारात्मक ऊर्जा आणि सर्व घटकांच्या सहभागाद्वारे **रु. १०५० कोटी इतक्या ठेवी** संकलनाचा निर्धार करण्यात येऊन आपण सर्वांनी प्रदान केलेल्या अभुतपुर्व अशा सहकार्यामुळे **रु. १०६९ कोटी इतक्या ठेवी** संकलन करण्यात आपण यशस्वी झालेलो आहोत. अहवाल वर्षात आपल्या बँकेने खालीलप्रमाणे नेत्रदिपक अशी आर्थिक प्रगती साधलेली आहे.

(₹ in Crores)

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०२४ अखेर | ३१ मार्च २०२५ अखेर | ३१ मार्च २०२६ अखेर | वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वनिधी (Owned Fund) | 138.85 | 136.98 | 150.34 | 13.36 |
| २ | ठेवी (Deposits) | 851.49 | 873.64 | 1068.96 | 195.32 |
| ३ | कर्जे (Advances) | 571.15 | 586.77 | 673.62 | 86.85 |
| ४ | **एकुण संमीश्र व्यवसाय (Total Business Mix)** | **1422.64** | **1460.41** | **1742.59** | **282.18** |
| ५ | गुंतवणूक (Investments) | 236.03 | 202.47 | 267.49 | 65.02 |
| ६ | खेळते भांडवल (Owned Fund) | 1003.99 | 1034.02 | 1253.76 | 219.74 |
| ७ | निव्वळ नफा (Net Profit) | 8.61 | 10.24 | 10.40 | 0.16 |
| ८ | ढोबळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण (% of Gross NPAs) | 6.62% | 5.29% | 4.73% | (0.56) |
| ९ | निव्वळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण (% of Net NPAs) | 0.17% | 0.00% | 0.00% | ----- |
| १० | नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) | 62.40 | 70.75 | 77.95 | 7.20 |
| ११ | भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण (% of CRAR) | 14.88% | 16.30% | 16.05% | (0.25%) |
| १२ | Provision Coverage | 94.56% | 110.00% | 107.00% | (3.00%) |
| १३ | **ऑडिट वर्ग (Audit Class)** | **"A"** | **"A"** | **"A"** | ----- |

गेल्या आर्थिक वर्षात बँकेने विविध आव्हानांचा सामना करतांना आपली आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि ग्राहक केंद्रीत दृष्टीकोन कायम ठेवला. वाढत्या स्पर्धात्मक वातावरणातही ठेवी, कर्जवाटप आणि संमिश्र व्यवसाय यामध्ये वाढ साध्य करण्यात आपण यशस्वी ठरलेलो आहोत. आपल्या बँकेचा भांडवली पाया हा अतिशय सक्षम असल्याची भावना असुन बँकेचे रु. १५०.३४ कोटी इतके स्वनिधी ही बाब अधोरेखीत करणारी आहे. गत वर्षाचे तुलनेत माहे ३१ मार्च, २०२६ अखेर बँकेच्या ठेवींमध्ये रु. १९५.३२ कोटी (२२.३६%) इतकी वाढ होऊन त्या रुपये १०६८.९६ कोटी इतक्या झालेल्या आहेत. गेल्या आर्थिक वर्षात बँकेच्या कर्ज वितरणामध्ये रु. ८६.८५ कोटी (१४.८०%) इतकी वाढ होऊन वर्षाअखेर एकुण कर्जे ही रु. ६७३.६२ कोटी इतकी झालेली आहेत. त्यामुळे बँकेच्या ग्राहक वर्गाचा बँकेवर असलेला विश्वास हा अधिक वृध्दिंगत झालेला असल्याचे नमुद करावे लागेल. अहवाल

वर्षामध्ये ठेवींमध्ये समाधानकारक वाढ झालेली असल्यामुळे ठेवींवरील व्याज खर्चामध्ये वाढ झालेली आहे. तथापि, सुरक्षीत स्वरुपच्या कर्ज वितरणावर सर्वाधिक भर देऊन कर्जावरील व्याज उत्पन्नामध्ये वाढ करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. आपणांस ज्ञातच आहे की, अहवाल वर्षातील माहे २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत अर्थव्यवस्था सुरळीत कार्यान्वीत असतांना अमेरिका-इराण मध्ये उद्भवलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे वर्षाअखेर सरकारी कर्ज रोख्यांचे किंमतीमध्ये घसरण झाल्याने गुंतवणूक घसारा निधी रकमेपोटी रु. २.९२ कोटी इतकी तरतुदी करावी लागल्याने गेल्या आर्थिक वर्षात आपल्या बँकेस रु. १०.४० कोटी इतका निव्वळ नफा झालेला आहे.

मालमत्ता गुणवत्तेच्या बाबतीत, बँकेने प्रभावी असे कर्ज व्यवस्थापन व कर्ज वसुली प्रक्रीयेच्या माध्यमातून समाधानकारक स्थिती राखलेली आहे. Gross NPA 4.73% असुन Net NPA 0% (शून्य टक्के) राखण्यात यश प्राप्त झालेले आहे. जे बँकेच्या काटेकोर जोखीम व्यवस्थापनाचे आणि सक्षम अशा अंतर्गत नियंत्रण प्रणालीचे द्योतक आहे. आपल्या बँकेने यंदाच्या वर्षात उल्लेखनीय प्रगती साधत महत्वाचा टप्पा गाठत **Tier-3 Urban Co-Operative Bank** म्हणून उन्नती प्राप्त केलेली आहे. ही आपणा सर्वांसाठी एक अभिमानाची बाब आहे. ही प्रगती केवळ एक संस्थापक यश नसून आपणा सर्वांचा विश्वास, परिश्रम आणि सहकार्याचे फलित आहे. गेल्या आर्थिक वर्षात बँकेच्या कार्यरत असलेल्या २७ शाखाचे माध्यमातुन बँकेचा एकुण **संमीश्र व्यवसाय रु. १७४२.५८ कोटी** पर्यंत पोहोचला असुन ही वाढ आपल्या ग्राहकांचा वाढता विश्वास आणि बँकेच्या सुदृढ कार्यपध्दतीचे प्रतीक आहे. बँकेचा Capital to Risk Weighted Assets Ratio (CRAR) 16.05% इतका मजबूत राहिलेला आहे. जो नियामक अपेक्षेपेक्षा अधिक असुन बँकेच्या भांडवली सामर्थ्याचे द्योतक आहे. अहवाल वर्षातही आपल्या बँकेला **ऑडीटवर्ग "अ"** प्राप्त झालेला असुन स्वच्छ व पारदर्शी व्यवहार, व्यक्तीगत सेवा व संबंध, सामाजिक बांधिलकी जोपासण्याबाबत सर्व स्तरावर होत असणारे प्रयत्न यांमुळे बँकेच्या ग्राहक वर्गाचा बँकेवर असलेला विश्वास अधिक वृध्दिंगत झालेला आहे.

### वेध आगामी वाटचालीचा :

सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी आगामी वर्ष संधी व आव्हाने यांचे मिश्रण असणार आहे. नागरी सहकारी बँकांत येऊन ग्राहक कर्ज घेणे, ठेवी ठेवणे असे व्यवहार काळानुरुप कमी होणार आहेत. त्यामुळे सहकारी बँकांनी ग्राहकांपर्यंत पोहोचुन जास्तीत जास्त प्रमाणात सेवा-सुविधा प्रदान करणेबाबत व्यवसायभिमुखता बाळगण्याची गरज आहे. वाढती स्पर्धा, तंत्रज्ञानातील गुंतवणूक, सायबर सुरक्षा आणि नियामक अनुपालन या बाबींवर अधिक भर द्यावा लागणार असला तरी स्थानिक ग्राहकांशी असलेले दृढ संबंध, वित्तीय समावेशातील भूमिका आणि वाढती आर्थिक क्रियाशीलता यांमुळे सहकारी बँकांसाठी विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. या पार्श्वभूमीवर, आपल्या बँकेने मजबूत भांडवली क्षमता, प्रभावी जोखीम व्यवस्थापन, गुणवत्तापुर्ण कर्जवाटप, डिजीटल बँकिंगचा विस्तार आणि ग्राहक केंद्रीत सेवा यांच्या माध्यमातून स्थिरता, सुरक्षितता व शाश्वत नफाक्षमता कायम राखण्याचा निर्धार केलेला आहे.

भावनात्मक न होता बँकेच्या दिर्घकालीन आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने दैनंदिन कामकाज करण्याबाबत, भारतीय रिझर्व्ह बँकेस अभिप्रेत असलेल्या आर्थिक दृष्ट्या सक्षम व सुयोग्य व्यवस्थापन असलेल्या नागरी सहकारी बँकांबाबतच्या सक्षमतेच्या सर्व कसोट्या [Eligibility Criteria for Business Authorization (ECBA)] करण्याबाबतचे धोरण कायम ठेऊन आगामी कालावधीतही बँकेच्या कारभारात व्यवसायिकतेचा स्विकार करुन बँकेला सहकारी बँकांमध्ये अग्रभागी नेण्यासाठी, **आगामी दोन वर्षांमध्ये आपल्या बँकेस शेड्युल्ड बँकेचा दर्जा** प्राप्त होण्याकरीता बँकेचे आगामी कालावधीकरीता विकासाचे खालील धोरण आखण्यात आलेले आहे.

- Tier-3 Urban Co-Operative Bank दर्जा प्राप्त झाल्यामुळे बँकेसमोर विस्ताराच्या नव्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. यामध्ये नविन शाखा विस्तार, तंत्रज्ञान उन्नतीकरण, डिजीटल बँकिंग सेवा-सुविधा वाढविणे आणि ग्राहक सेवांमध्ये अधिकाधिक सुधारणा करण्यावर विशेष भर देऊन बँकेत भारतीय रिझर्व्ह बँकेस अपेक्षीत असलेले Goverence & Compliance Culture प्रस्थापित करणे.

- कर्मचारी वर्ग हा बँकेचा मुख्य आधारस्तंभ आहे. त्याच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ, प्रशिक्षण व कौशल्य विकास यावर सातत्याने लक्ष केंद्रित करणे. याचबरोबर, ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी उत्कृष्ठ सेवा देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट राहील. भविष्यात, बँक अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधारित व ग्राहकाभिमुख बँक म्हणून आपली ओळख अधिक बळकट करण्याचा बँक व्यवस्थापनाचा निर्धार आहे.

- आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग म्हणुन ओळखले जात आहे. तंत्रज्ञानाविषयी ग्राहकांच्या अपेक्षा उंचावलेल्या असुन तंत्रज्ञान स्विकारत असतांना तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात जोखीम असल्याने बँकिंग सेवा सुविधांचा वापर करताना काळजी घेणे अपेक्षीत असते. अलिकडे तंत्रज्ञानामध्ये **कृत्रिम बुध्दिमत्तेला (Artificial Intelligence)** अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले असुन आगामी कालावधीमध्ये कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर करुन व्यवसाय वृध्दी करण्यावर भर देण्याचे धोरण आहे.

- आगामी वर्षाअखेर बँकेचे कार्यक्षेत्र **नजीकच्या गोवा** या राज्यात विस्तारीत करुन **बँकेच्या किमान ३ शाखांचा** विस्तार करणे न बँकेचा **संमिश्र व्यवसाय रु. २१०० कोटी** पर्यंत वाढविण्याचे धोरण आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे बँकांच्या नियंत्रण पध्दतीत झालेल्या बदलांमुळे आपले ठेवीदार अधिकाधिक सुरक्षीत होत असुन भविष्यकाळात बँकांची विश्वासार्हता वाढुन बँकिंग क्षेत्रातील बँकेचे स्थान हे अधिक बळकट होणार आहे. अहवाल वर्षात बँकेसाठी कार्यरत असलेल्या सर्वच घटकांद्वारे विविध स्तरावर बँकेस चांगल्या प्रकारे सहकार्य प्राप्त झालेले असल्यामुळे बँकेसाठी काम करण्याची आम्हा सर्वांना एक वेगळी प्रेरणा प्राप्त होत असते. बँकेचे संचालक मंडळ सदस्य, बँकेचा समस्त सेवक वर्ग हा पुर्ण क्षमतेने आपल्या सेवेकरीता कायमस्वरुपी तत्पर असतो. आपणां सर्वांचे आपल्या बँकेवर निरतिश प्रेम आणि जिव्हाळा आहेच, तो याही पुढे वृध्दींगत होत राहील याची मला पुर्ण खात्री आहे. आगामी कालावधीत आपल्या बँकेच्या माध्यमातुन सर्व सामान्यांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास त्याचप्रमाणे बँकेने आखलेली विकासाची ध्येय्य-धोरणे पुर्णत्वास नेण्याकरीता आपणां सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा करतो.

**जय हिंद, जय सहकार**

आपला स्नेहांकित

**श्री. विक्रम विजयकुमार भिलारे**

## ◈ प्रशासन ◈

**श्री.ईश्वरदास दयाराम लालवाणी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री.गोविंद कृष्णा जाधव**
सरव्यवस्थापक

## ◈ उपसरव्यवस्थापक ◈

**श्री. अनिल गुलाबराव सणस**

**श्री. शितलचंद्र जयकुमार खोत**

## ◈ सहाय्यक सरव्यस्थापक ◈

**श्री.संजय साहेबराव सकपाळ**

**श्री.सुधाकर यशवंत दळवी**

**श्री.संतोष श्रीकांत वैद्य**

---

## ◈ वैधानिक लेखापरिक्षक ◈

**जैन त्रिपाठी ॲण्ड कंपनी (चार्टड अकौटंट)**

---

## ◈ टॅक्स ऑडिटर्स ◈

**मे विंदु अॅन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ जी एस टी ऑडिटर्स ◈

**मे यु जी देवी अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ समावर्ती लेखापरिक्षक ◈

**मे विवेक शहा अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे पायल गाडा अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे विंदु अँड असोसिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे केसरी अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे पटवर्धन शेखावत अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे डी जी ठकरार अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे रुपेश सावले अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे ए एस देव अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे नितीन दळवी अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे सपना जैन**
चार्टर्ड अकौंटंट

**मे मयुरेश बनकर अँड असाशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे वर्षा काळे अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे बी आर सावंत अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ स्टॉक ऑडीटर्स ◈

**मे विंदू अँड असोशिएटस**
चार्टर्ड अकौंटंट

**मे एम.के.टी.एस.के. अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे खेरिया अँड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ आय.एस. ऑडीटर्स ◈

**मे कोड डिकोड लॅबस प्रा. लि.**

## बँकर्स

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | मुंबई जिल्हा मध्य सह बँक लि., | सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि. |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | एच डी एफ सी बँक लि. | आय डी बी आय बँक | आय सी आय सी आय बँक लि., |
| बँक ऑफ इंडिया | बँक ऑफ बडोदा | येस बँक लि. | युनिटी स्माल फायनान्स बँक लि. |

## कॉर्पोरेट एजन्सीज

विमा व्यवसाय : आय सी आय सी आय लोंबार्ड इन्शुरंन्स कं.लि., कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरंन्स कं.लि.,युनिव्हर्सल सोम्फो जनरल इन्शुरंन्स कंपनी, रिलायन्स जनरल इन्शुरंन्स कंपनी, आदित्य बिर्ला सनलाईफ इन्शुरंस कं.लि., चॉईस ब्रोकर.
पॅनकार्ड : यु टी आय इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड सर्व्हीसेस लि., (UTIITSL)

# दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.
# DMK JAOLI SAHAKARI BANK LTD.

नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम. / बी.एन.के. / १२७ ऑफ १९७३
प्रशासकीय कार्यालय : ४१८/ २०/ २२, मौलाना आझाद रोड, मुंबई - ४०० ००४.
मो.क्र.: +९१-८४२५८८१२८३ Email : hoadmin@dmkjaoli.bank.in, hoaccounts@dmkjaoli.bank.in
Website : https://www.dmkjaoli.bank.in

## ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरीता )**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार दिनांक २१.०६.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता डॉ. अँटोनिओ डी-सिल्व्हा हायस्कुल, एस. के. बोले रोड, कबुतरखान्याजवळ, दादर (प), मुंबई - ४०० ०२८** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## —*— सभेपुढील विषय —*—

१. दिनांक २२ जून, २०२५ रोजी संपन्न झालेल्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करुन त्यास स्विकृती देणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२५-२०२६ च्या करण्यात आलेल्या नफा-विभागणीस मान्यता देणे.
४. वैधानिक लेखा परिक्षकांचा सन २०२५-२०२६ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.
५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२६-२०२७ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
६. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पुर्व मान्यतेने आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करीता करण्यात आलेल्या वैधानिक लेखा परीक्षकांचे नियुक्तीबाबत नोंद घेणे आणि त्यांना अदा करावयाचा मेहनतांना ठरविण्याचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळ सभेस प्रदान करणे.
७. माहे ३१ मार्च, २०२६ अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जाची नोंद घेणे.
८. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधीतील धोरण यांचा आढावा घेणे.
९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे दुरुस्तीस मान्यता देणे (प्रस्तावित उपविधीतील कलम 1, 3, 4(xviii), (xxix), 22(i), 39(i), 40, 57(c), 58(d), 59(d) & 61 (c) चे दुरुस्तीचा मसुदा अहवालाचे पान क्र. ५५ ते ६१ वर देण्यात आलेला आहे.
१०. ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे.
११. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाचे संमतीने
**ईश्वरदास दयाराम लालवाणी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

मुंबई
दिनांक : ०५.०६.२०२६

## —*— विशेष सुचना —*—

१. गणसंख्येपुर्ती अभावी सभा तहकुब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक १०.३० वाजता सुरु होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना विधायक स्वरुपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि. १२.०६.२०२६ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय - ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई - ४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात अथवा hoscr@dmkjaoli.bank.in या ई-मेलवर आयडी वर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल.

३. भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी / खातेदारांनी के.वाय.सी. (K.Y.C.) बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करुन घ्यावी, त्याकरीता आपल्या शाखेत संपर्क करावा.

४. बँकेच्या सन २०२५-२०२६ वर वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईट https://www.dmkjaoli.bank.in वर प्रसिध्द करण्यात आलेल्या असुन प्रत बँकेच्या सर्व शाखांत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## भावपुर्ण श्रद्धांजली



## स्व. अजितदादा पवार

राजकीय आणि सामाजिक क्षेत्राला ज्यांनी आपल्या कणखर
नेतृत्वाने दिशा दिली असे आपल्या महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय
नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री
**अजितदादा पवार** यांचे दिनांक २८ जानेवारी २०२६
रोजी विमान अपघातात दु:खद निधन झाले.
आपले लाडके अजित दादा आपल्यात नाहीत याचे
दु:ख अखंड महाराष्ट्र राज्याला असुन सामान्य माणसाच्या
कामासाठी धावणारा, एक शिस्तबध्द प्रशासक
आज काळाच्या पडद्यामागे गेलेला आहे.
आपल्या दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक परिवाराचे
वतीने आदरणीय दादांना "भावपुर्ण श्रध्दांजली"!!!

**भावपुर्ण श्रध्दांजली :**

अहवाल वर्षात आपल्या सुमधुर गायणाने रसीकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या प्रख्यात जेष्ठ गायिका **आशा भोसले व सुमन कल्याणपुर**, बँकेचे माजी संचालक **तुकाराम रामचंद्र घाडगे**, बँकेचे माजी संचालक व जावली पंचायत समितीचे मा. उपसभापती **शंकरराव सिताराम साळुंखे (अण्णा)**, बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्री. विक्रम भिलारे यांच्या आजी **ताराबाई सखाराम भिलारे**, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक श्री. चंद्रकांत गावडे यांचे वडील **रावसाहेब आबाजी गावडे (पाटील)** आणि आई **सौ. राधाबाई रावसाहेब गावडे**, चुलत भाऊ **शिवराम दगडु गावडे**, चुलती **ताराबाई कोंडीबा गावडे**, बँकेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक श्री. प्रकाश जगन्नाथ मस्कर यांच्या मातोश्री **श्रीमती चंद्रभागा जगन्नाथ मस्कर**, बँकेचे संचालक श्री. संतोष कळंबे यांचे वडील **रामचंद्र धोंडीबा कळंबे**, बँकेचे संचालक श्री. अजित कळंबे यांची चुलती **सिताबाई विष्णु कळंबे**, बँकेचे संचालक श्री. तुकाराम शिंदे यांची आई **जाईबाई जानू शिंदे**, बँकेचे माजी संचालक श्री. सुभाष लक्ष्मण कदम यांची आई **सौ. विजया लक्ष्मण कदम**, बँकेचे व्यवस्थापक श्रेणीचे कर्मचारी **राजेंद्र दत्तात्रय निकम**, बँकेचे कर्मचारी रामचंद्र चोरट यांची आई **तानुबाई भिकु चोरट**, बँकेचे कर्मचारी सुनील सर्जेराव यादव यांची आई **ताराबाई सर्जेराव यादव**, बँकेचे कर्मचारी रविंद्र देशमुख यांचे चुलते **श्रीकृष्ण राजाराम देशमुख**, बँकेचे कर्मचारी अक्षय देशमुख यांचे वडील व माजी कर्मचारी **अंकुश शामराव देशमुख**, बँकेचे कर्मचारी दत्तात्रय जवळ यांची आई **जनाबाई राजाराम जवळ**, बँकेचे कर्मचारी सुयश रघुनाथ देशमुख यांची आजी **मुक्ताबाई आनंदराव देशमुख**, बँकेचे कर्मचारी क्षितीज गोळे यांची आजी **हिराबाई हणमंत गोळे**, बँकेचे माजी कर्मचारी श्री. मानसिंग भिलारे यांच्या आई **चतुराबाई नाथ्याबा भिलारे**, बँकेचे माजी कर्मचारी श्री. दिलीप तरडे यांचे वडील **शंकर विठोबा तरडे**, बँकेचे माजी कर्मचारी बाळासाहेब नवले यांची आई **कृष्णाबाई धर्माजी नवले**, बँकेचे माजी कर्मचारी विकास महामुलकर यांचे भाऊ **श्रीरंग शंकर महामुलकर**, बँकेचे कर्मचारी मारुती महामुलकर यांचे चुलतभाऊ **दादासाहेब शिवराम महामुलकर**, बँकेचे संस्थापक ह.भ.प.वै. दत्तात्रय महाराज कळंबे यांचे अनुयायी व बेलोशी गावचे **ह.भ.प. हणुमंत महाराज बेलोशे**, बँकेचे सभासद व उद्योजक श्री. के. के. शेलार यांचे वडील **काशीनाथ देवजी शेलार**, बँकेचे सभासद व आंबेघर गावचे **दिलीप हणमंत दिघे**, सातारा जिल्हा परिषद भुईंज गटाचे सदस्य **प्रकाश चव्हाण** यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे अहवाल वर्षात देशसेवा बजावतांना शहीद झालेले संरक्षण आणि सेना दलातील वीर जवान, पंचतत्वात विलीन झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यीक, चित्रपट व नाट्य क्षेत्रातील नामवंत कलाकार, शिक्षण तज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. क्षेत्रात ख्याती प्राप्त झालेल्या व्यक्ती, बँकेचे ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, हितचिंतक, संचालक व कर्मचारी वर्गाचे नातेवाईक, यांनाही काळाने आपल्यातुन हिरावुन नेलेले आहे. त्या सर्वांच्या कुटूंबियांच्या दु:खात आपला दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक परिवार सहभागी असुन दिवंगतांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात येत आहे.

## —*— संचालक मंडळाचा अहवाल —*—

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

आपल्या बँकेने वेळोवेळी विकसीत होत जाणारे तंत्रज्ञान, ग्राहकाभिमुखता, सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च प्राधान्य देत अहवाल वर्षात व्यवसायामध्ये समाधानकारक प्रगती साधलेली असल्याने बँकेचा ३१ मार्च २०२६ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, कॅश फ्लो बाबतचे माहितीपत्रक आणि वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल बँकेच्या संचालक मंडळाचे वतीने आपणांसमोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार :**

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असे असून बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्राहकांना विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा-सुविधा प्रदान करण्याचे सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. आपल्या बँकेच्या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक आणि सहकार खात्याचे परवानगीस अधिन राहुन बँकेचे कार्यक्षेत्र **गोवा या राज्यातही** विस्तारीत करण्याचे संचालक मंडळाचे धोरण आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेद्वारे बँकेच्या **चेंबूर शाखेचे** नवीन जागेत स्थानांतर करण्यात आलेले असुन नवी मुंबईत **तुर्भे, उलवे-बामनडोंगरी, तळोजा-पेंधर**, या तीन नवीन शाखां कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. बँकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या **२७ शाखा** या कोअर बँकिंग सोल्युशन कार्यप्रणाली अंतर्गत कार्यान्वित असून समस्त खातेदारांना बँकेच्या कोणत्याही शाखेमार्फत आपल्या खात्यांवर विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा-सुविधा प्राप्त करुन घेण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

**सभासद संख्या व भागभांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे ५३४८३ इतके नियमत तर १८१० नाममात्र सभासद होते. अहवाल वर्षात ७१७ सभासद निवृत्त झाले तर १८०८ सभासद नव्याने दाखल झाले. वर्षाअखेर आपल्या बँकेचे ५४५७४ नियमित तर १५९६ इतके नाममात्र सभासद आहेत. या आकडेवारीवरुन बँकेच्या सभासद संख्येत दिवसेंदिवस समाधानकारकरित्या वाढ होत असून बँकेच्या कामकाजातील सभासदांचा वाढता सहभाग हे बँकेच्या विकासाचे तसेच बँकेचा भांडवली पाया मजबूत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल.

आपल्या बँकेच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा रु. ५०.०० कोटी असून गत वर्षी बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २५.२३ कोटी इतके होते. अहवाल वर्षात निवृत्त झालेल्या सभासदांना रु. १.३८ कोटी भाग भांडवल परत करण्यात आले. बँककडे दाखल झालेल्या नविन सभासदांकडून रु. ३.५७ कोटी इतके भाग भांडवल वसूल झाल्याने वर्षाअखेर आपल्या बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २७.४२ कोटी इतके झालेले आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या भाग भांडवलात ८.६८% इतकी वाढ झालेली आहे.

### राखीव व इतर निधी :

गतवर्षी अखेर आपल्या बँकेचे राखीव व इतर निधी रु. १११.७५ कोटी इतके होते. अहवाल वर्षात सदर निधींमध्ये रु. ११.१७ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर राखीव व इतर निधी रु. १२२.९२ कोटी इतके झालेले आहेत. बँकेने प्राप्त केलेल्या नफ्यातुन संचीत केलेल्या विविध स्वरुपाच्या निधींचे प्रमाणावर (Reserves) बँकेचे आर्थिक स्थैर्य अवलंबुन असल्याने बँकेची नफा क्षमता वाढवुन वैधानिक राखीव निधी व इतर निधीत वाढ करण्यासाठी अहवाल वर्षात सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. आपल्या बँकेचे भरीव स्वरुपातील राखीव व इतर निधी हे आपली सक्षमता अधोरेखीत करीत आहेत.

अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे स्वनिधी (Owned Funds) रु. १५०.३४ कोटी इतके असून नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) रु. ७७.९५ कोटी इतके आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्देशित केल्याप्रमाणे बँकांच्या पर्याप्त भांडवलाचे जोखमीत असलेल्या मालमत्तेशी (CRAR) प्रमाण हे १२% राखणे आवश्यक असतांना आपल्या बँकेने वर्षाअखेर हे प्रमाण १६.०५% इतके राखलेले आहे. बँकेने व्यवसायांतर्गत उद्‌भवणाऱ्या संभाव्य धोक्यांचे वेळोवेळी योग्यरित्या मूल्यांकन केलेले असून व्यवसायातील संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निर्माण केलेली आहे.

### ठेवी :

अहवाल वर्षातही बँकेने आपल्या जिंदगी देयतांचे (Assets Liability Management) सुयोग्य व्यवस्थापन केलेले आहे. अहवाल वर्षात ठेवींवरील व्याजदरांबाबत असलेल्या तीव्र स्वरुपाच्या स्पर्धेमुळेही इतर बँकांत असलेल्या ठेवींवरील व्याजदरांच्या साकल्याने अभ्यास करुन वेळोवेळी व्याज दरांत बदल करण्याचे धोरणाची अंमलबजावणी करुन आपल्या बँक ग्राहकांना मुदत ठेवींवर अधिकाधिक प्रमाणात व्याजदर प्रदान करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. गतवर्षी बँककडे सर्व प्रकारच्या रु. ८७३.६४ कोटी ठेवी होत्या. अहवाल वर्षात ठेवींमध्ये रु. १९५.३२ कोटीने वाढ होऊन त्या वर्षाअखेर रु. १०६८.९६ कोटी इतक्या झालेल्या आहेत. अहवाल वर्षात आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये २२.३६% इतकी वाढ झालेली आहे. आपल्या बँकेने अलीकडच्या कालावधीत मुदत ठेवींच्या आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. सर्व सभासद बंधूनी या योजनांचा लाभ घेण्याकरिता आम्ही या ठिकाणी नम्र आवाहन करीत आहोत.

### ठेवी विमा संरक्षण :

बँकेमार्फत ठेवीदारांचे रु.५.०० लाख रकमेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या ठेवींना ठेवी विमा व पतहमी निगम (DICGC) अंतर्गत विम्याचे संरक्षण देण्यात येते. बँकेने माहे ३० सप्टेंबर २०२६ अखेरचा विम्याचा हप्ता दि. २०/०५/२०२६ रोजी अदा केलेला आहे.

### बाहेरील कर्ज :

खातेदारांचे समाशोधन व्यवहारांचे व्यवस्थापनाकरिता बँकेद्वारे शामराव विठ्ठल सहकारी बँक, जना स्मॉल फायनांन्स बँक व सारस्वत सहकारी बँककडून मुदत ठेवींच्या तारणावर अनुक्रमे रु. १३.५० कोटी, रु. ९.०० कोटी व रु. १९.०० कोटी रकमेचे अधकर्ष कर्ज (ओडी) मंजूर करण्यात आलेले आहे. वेळोवेळी कर्ज खात्यांतून उचललेल्या रकमांचा संपूर्ण भरणा केलेला असल्याने वर्षाअखेरीस अधिकर्ष कर्जाचे बँकेस दायित्व नाही.

### निधी व्यवस्थापनांतर्गत वैधानिक तरतूद :

बँकिंग अधिनियम १९४९ चे कलम १८ आणि २४ मधील तरतूदींना अधिन राहून बँकेने अहवाल वर्षात वैधानिक स्वरुपात राखावयाची रोखता (CRR) व तरलता (SLR) याबाबतची कटाक्षाने पूर्तता केलेली आहे.

### गंतवणूक :

अहवाल वर्षात निधींचे व्यवस्थापनांतर्गत उपलब्ध असलेले अतिरिक्त निधी कर्ज वाटपासाठी तसेच अधिकाधिक परतावा देणाऱ्या बँकांच्या मुदत ठेवी, सरकारी कर्ज रोखे, कमर्शियल पेपर्स आदी स्वरुपाच्या गुंतवणुक दालनात गुंतवलेले आहेत.

(अ) गतवर्षी आपल्या बँकेचे तरलतेअंतर्गत **केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारचे कर्ज विकास रोखे** (Investment in GOI & SDLs Bonds) यांमधील गुंतवणुक रु.१६५.५३ कोटी इतकी होती. अहवाल वर्षात केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणूक रु. ६४.८२ कोटींनी वाढ झालेली असुन वर्षाअखेर ती रु. २३०.३५ कोटी इतकी झालेली आहे.

(ब) तर **बँकांअंतर्गत मुदत ठेवींतील** (Interbank Placements) गुंतवणुक रु. १४९.२३ कोटी इतकी होती. अहवाल वर्षात सदर गुंतवणुकीमध्ये रु. १.८५ कोटीने वाढ झालेली असुन वर्षाअखेर ती रु. १५१.०८ कोटी इतकी झालेली आहे.

अहवाल वर्षात सरकारी कर्ज रोखे खरेदी-विक्रीद्वारे बँकेस रु. ०.६९ कोटी इतका नफा प्राप्त झालेला आहे. अहवाल वर्षात भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे नागरी सहकारी बँकांना सक्षम करण्यासाठी Umbrella Organization म्हणुन अधिकृत मान्यता असलेल्या National Co-operative Finance & Development Corporation (NUFCDC) चे सभासदत्व प्राप्त केलेले असुन त्यांचे भागभांडवलामध्ये रु. २०.०० लाख रकमेची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. अहवाल वर्षाखेर इतर बँकां व आस्थापनांतील शेअर्स (Shares, PNCPs & Equity Shares) मधील गुंतवणूक रु. ३७.१४ कोटी इतकी आहे.

### कर्जव्यवहार :

अहवाल वर्षात कर्जांवरील व्याजदरांबाबत तीव्र स्पर्धा असतांना आपल्या बँकेने सुरक्षित व किरकोळ स्वरुपाची कर्जे वितरीत करुन कर्ज व्यवहारांत समाधानकारकरित्या वाढ करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षात अनुत्पादीत कर्ज वसुलीवर अधिक भर देण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. गतवर्षी बँकेने वाटप केलेल्या कर्जापैकी रु. ५८६.७७ कोटी इतके कर्जे येणे बाकी होती. त्यात रु. ८६.८५ कोटीने वाढ होऊन अहवाल वर्षाअखेर एकूण कर्जे येणे बाकी रु. ६७३.६२ कोटी इतकी आहेत. अहवाल वर्षाअखेर बँकेचे येणे असलेल्या कर्जांचे ठेवींशी गुणोत्तर (CD Ratio) ६३.०२% असल्याने बँकेने ठेवीदारांच्या ठेवींचे सुयोग्य व्यवस्थापन केलेले असल्याचे दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार आपल्या बँकेने अग्रगण्य घटकांस ६४.०५% तर दुर्बल घटकांस १०.६९% कर्जे वितरीत केलेली आहेत.

### कर्ज थकबाकी व अनुत्पादित कर्जे व्यवस्थापन :

अहवाल वर्षाअखेर बँकेला येणे असलेल्या कर्जापैकी ४.५१% कर्जे थकीत आहेत. तर एकूण कर्ज रक्कमेपैकी रु. ३१.८३ कोटी कर्जे ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPAs) म्हणून वर्गीकृत करण्यात आलेली आहेत. आपल्या बँकेने उत्पादित तसेच अनुत्पादित कर्जासाठी अतिरिक्त स्वरुपात तरतूदी केलेल्या असल्याने बँकेची निव्वह अनुत्पादित कर्जे (Net NPAs) ०.००% इतकी आहेत. अहवाल वर्षात बँकेचे संचालक मंडळ सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्गाने कर्ज थकबाकी वसुलीस सर्वोच्च प्राधान्य देत अनुत्पादित कर्ज वाढीवर समाधानकारकरित्या नियंत्रण राखलेले आहे. कर्जदारांना आपल्या कर्जाचे हप्ते नियमित भरणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

### खेळते भांडवल :

गतवर्षी आपल्या बँकेचे खेळते भांडवल रु. १०३४.०२ कोटी इतके होते. अहवाल वर्षात त्यात रु. २१९.७४ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर ते रु. १२५३.७६ कोटी झालेले आहे. अहवाल वर्षातील खेळत्या भांडवलातील वाढ ही प्रामुख्याने बँकेच्या ठेवींमध्ये झालेली वाढ त्याचप्रमाणे सुधारीत अकांऊटिंग स्टँडर्डच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या लेखापद्धतील बदल आदी बाबींमुळे झालेली असुन आगामी कालावधीत बँकेच्या व्यवसाय वाढीकरीता सर्वतोपरी प्रयत्न करुन खेळत्या भांडवलामध्ये समाधानकारक वाढ केली जाणार आहे.

### संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे :

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना बँकेमार्फत मंजूर करावयाच्या कर्जांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असल्यामुळे अहवाल वर्षात अशी कर्जे वितरीत करण्यात आलेली नाहीत. तथापि, वैधानिक स्वरुपात सादर कराव्या लागणाऱ्या माहितीपत्रात संचालक मंडळात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी व त्यांचे नातेवाईकांनी बँकेकडून संचालक मंडळाचे निवडणूकीपूर्वी घेतलेली कर्जे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे वर्षा अखेर येणे म्हणून दाखविणे अभिप्रत असते. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातवाईक यांच्या दि. ३१/०३/२०२६ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०२६ अखेरच्या कर्जाची माहिती** (रु. लाखांत)

| संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक की ज्यांनी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे त्यांची संख्या | वर्षाच्या सुरुवातीला वाटप केलेल्या कर्जापैकी येणे असलेल्या कर्जाची रक्कम (दि.०१.०४.२०२५) | दि. ०१.०४.२०२५ ते दि. ३१.०३.२०२६ या कालावधीत वाटप झालेली रक्कम | दि. ०१.०४.२०२५ ते दि. ३१.०३.२०२६ या कालावधीत वसुली झालेली रक्कम | वर्षाअखेर असलेल्या येणे कर्जाची रक्कम (दि. ३१.०३.२०२६) | येणे कर्जापैकी थकबाकी असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अ) संचालक - ० | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- |
| ब) संचालकांचे नातेवाईक - | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- |
| **एकुण रुपये** | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- |

**संचालक मंडळ व समित्या सभा :**

बँकेच्या संचालक मंडळात आर्थिक, सामाजिक, कामगार व औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेले सदस्य असून त्यांच्यात असलेला व्यवसायिक दृष्टीकोन व दुरदर्शीपणा बँकेच्या सर्वांगीण विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतो. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. बँकेचे सर्व संचालक सदस्य सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व बँकेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचे प्रयत्न करतात. बँकेतील विविध विभागांचे कामकाज जलदगतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळांतर्गत असलेली कर्ज मंजुरी समिती, कार्यकारी समिती, ऑडीट समिती, वसुली समिती, गुंतवणूक समिती, संगणक समिती, एकरकमी तडजोडीने कर्ज वसुली समिती यांच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या सभांनाही समिती सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे.

## संचालक मंडळ व उपसमित्या सभांमधील सदस्यांची २०२५-२०२६ उपस्थिती

| अ.क्र. | संचालकाचे नाव | एकूण सभा | संचालक सभा | उपसमित्या सभा | उपस्थिती | उपस्थितीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. विक्रम विजयकुमार भिलारे | १२ | १२ | ० | १२ | १००.००% |
| २ | श्री. चंद्रकांत तानाजी दळवी | २६ | १२ | १४ | २६ | १००.००% |
| ३ | श्री. चंद्रकांत रावसाहेब गावडे | ४१ | १२ | २९ | ३९ | ९५.१२% |
| ४ | श्री. प्रकाश जगन्नाथ मस्कर | ३७ | १२ | २५ | ३६ | ९७.३०% |
| ५ | श्री. योगेशराव हरिभाऊ गोळे | ३६ | १२ | २४ | ३५ | ९७.२२% |
| ६ | श्री. अरुण बाबुराव सुर्वे (दि. ३/५/२०२५ पर्यंत) | ३ | १ | २ | ३ | १००.००% |
| ७ | श्री. संतोष रामचंद्र कळंबे | ३७ | १२ | २५ | ३७ | १००.००% |
